पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांच्या पैलूंवर पथनाट्यातून प्रकाश...

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विद्यार्थ्यांमध्ये प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या सामाजिक कार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'ला यंदा तीन वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून राज्य सरकारतर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहाचे आयोजन केले आहे. विद्यापीठात यानिमित्ताने पोस्टर, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, पथनाट्य, रिल्स स्पर्धा सुरू आहेत. उपक्रमांतर्गत शुक्रवारी विद्यापीठात महाराष्ट्रीय शैक्षणिक धोरणाविषयी जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी प्रिया देशमुख, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. उत्तम सकट, डॉ. नितीन माळी, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. उमेश गडेकर, डॉ. गजानन साळुंखे उपस्थित होते.



**कोल्हापूर : प्रशासकीय इमारतीसमोर पथनाट्य सादर करताना विद्यार्थी.**

सकाळ

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह पोस्टर स्पर्धेत फर्नांडिस, रंजन विजेते

## शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन; जनजागृती सप्ताह

कोल्हापूर, ता. २९ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जनजागृती सप्ताहांतर्गत येथील शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (ता. २८) आयोजित पोस्टर प्रदर्शन आणि स्पर्धेमध्ये मर्सी फर्नांडिस, पुण्यश्री रंजन यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे अधिविभागांतील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताहांतर्गत (एनईपी २०२० विक @ एसयूके) पोस्टर प्रदर्शन आणि स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, सामाजिक समावेशन केंद्राचे डॉ. अविनाश भाले आणि समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे उपस्थित होते.




कोल्हापूर : पोस्टर प्रदर्शनाची डॉ. विलास शिंदे यांनी पाहणी केली.

सायंकाळी या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यामध्ये मर्सी फर्नांडिस व पुण्यश्री रंजन यांनी प्रथम, बन्सी होवाळ व ऐश्वर्या कदम यांनी द्वितिय आणि अभिजित गाताडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. डॉ. पाटणकर, डॉ. खंडागळे आदींच्या उपस्थितीत प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

### अभ्यासपूर्ण पोस्टर्सचे सादरीकरण

या प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अतिशय अभ्यासपूर्ण पोस्टर्सचे सादरीकरण केले. चार वर्षांचा पदवी कार्यक्रम, बहुप्रवेश-बहुनिर्गमन पद्धती, राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क, ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स, ग्रॉस एनरोलमेंट रेशो, भारतीय ज्ञान प्रणाली, कार्यस्थळावर प्रशिक्षण (इंटर्नशिप अथवा अप्रेंटिसशिप), सामुदायिक सहभाग, मुक्त व ऑनलाईन शिक्षण आदी महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

30 JUL 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात यंदापासून एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रम

## प्रथमच अशा प्रकारचा अभ्यासक्रम; रोजगाराच्या असंख्य संधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

योगशास्त्राचे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या योगप्रेमी, जिज्ञासूंसह योग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठातर्फे २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून एम.ए. (योगशास्त्र) हा द्वैवार्षिक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार अधिविभागामार्फत योगशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावाला अधिकार मंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. योग क्षेत्रामध्ये व्यावसायिक कारकिर्द घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदवीनंतर हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. शिवाजी विद्यापीठात प्रथमच अशा स्वरूपाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ कॅम्पसमध्ये उपलब्ध केला जात आहे.

**अभ्यासक्रमात समाविष्ट घटक**

एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रमात शरीरशास्त्र, शरीरक्रिया विज्ञान, विविध प्राचीन आणि आधुनिक योगग्रंथांतील हठयोग, शास्त्रीय योग, निसर्गोपचार, आयुर्वेदाचे सिद्धांत, योग तत्त्वज्ञान, पूरक चिकित्सापद्धती, मानसशास्त्र, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादींसह सर्वसमावेशक अभ्यासक्रम आहे.

**रोजगाराच्या जगभरात असंख्य संधी**

अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या पदवीधरांना पुढे यूजीसी नेट, पीएच.डी. करून सहायक प्राध्यापक, प्राध्यापक होता येते. याशिवाय सरकारी हॉस्पिटल, प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी योग प्रशिक्षक, योग चिकित्सक व नामांकित खासगी रुग्णालयांत योगथेरपिस्ट म्हणून संधी आहेत. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, योग संस्था, हॉटेल्स, स्पा, जिम (व्यायामशाळा) या ठिकाणीही रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

**योगाचे महत्त्व होणार अधोरेखित**

योगामध्ये अनेक वैश्विक, सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय समस्यांवर उत्तर दडले आहे. योग क्षेत्रामध्ये नवनवीन रोजगाराच्या अनेक संधी जगभरात उपलब्ध असून, त्यामध्ये वेगाने वाढ होत आहे. 'महिल इन इंडिया' आणि 'महिल बाय इंडिया' या दोन्ही उपक्रमांमध्ये योग केंद्रस्थानी आहे. अशा वेळी योग फक्त व्यक्तीच्या जीवनातच नाही, तर राष्ट्रीय आणि वैश्विक स्तरावर परिवर्तन घडवून आणण्यासाठी सक्षम आहे, अशी माहिती विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ रामचंद्र पवार यांनी दिली.




### जगभरात योगाचे महत्त्व वाढले

भारतात योगाविषयी किरकोळ तंदुरुस्ती सेवा बाजार २.६ अब्ज अमेरिकी डॉलर्सचा आहे. योग क्षेत्राची बाजारपेठ ८० अब्ज डॉलर्सची आहे. योग क्षेत्राशी संबंधित उपकरणांची बाजारपेठ कोव्हिड-१९ दरम्यान १५४ टक्क्यांनी वाढली आहे. परदेशातील विद्यापीठांमध्ये योग विभाग व योग संबंधित पदवीचे शिक्षण दिले जाते. गेल्या काही वर्षांपासून योग शाळा, योग थेरपी सेंटर यामध्ये वाढ झाली आहे. २०२२ ते २०३० दरम्यान ५.८ टक्के वार्षिक वाढीचा अंदाज आहे.

लोकमत

# विद्यापीठाच्या २० ऑक्टोबरपासून हिवाळी सत्र परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील हिवाळी सत्रातील परीक्षांचे प्रारंभीचे वेळापत्रक परीक्षा विभागाने परिपत्रकाद्वारे जाहीर केले. विद्यापीठाच्या ५५८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. यात बी.ए. अंतिम वर्षातील सेमिस्टर पाच, बी.कॉम. अंतिम वर्ष सेमिस्टर पाच, बी.कॉम. आयटी सेमिस्टर पाच, बी.कॉम. बिझनेस मॅनेजमेंट सेमिस्टर समिस्टर पाच, बी.कॉम. सेमिस्टर दोन, बी.एस्सी. अंतिम वर्ष सेमिस्टर पाच यांसह विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा २५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. बी.एस्सी. पर्यावरणशास्त्र सेमिस्टर सहा, बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स सेमिस्टर यासह विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा २३ ऑक्टोबरपासून सुरू होतील. व्होकेशनल अभ्यासक्रमांच्या परीक्षांना २० ऑक्टोबरपासून प्रारंभ होईल. परीक्षांच्या प्रारंभीच्या तारखा समजल्याने महाविद्यालय व अधिविभागांनी अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करावयाचे आहेत. दरम्यान, पारंपरिक अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

पुढारी

# जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार

## शिवाजी विद्यापीठातून

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

चीनमधील चेंगडू येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या पाच क्रीडापटूंचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

चीनमधील चेंगडू येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी पाच क्रीडापटूंची भारतीय विश्वविद्यालय संघात निवड झाली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात जागतिक स्पर्धेसाठी पाच खेळाडूंची एकाच वेळी निवड होण्याचा पहिलाच प्रसंग आहे. त्याबद्दल क्रीडापटूंचा सत्कार समारंभ झाला.

यावेळी भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू ओंकार कुंभार, सिद्धांत पुजारी, सुदेष्णा शिवणकर, रेश्मा केवटे व राणी मुचंडी यांचा सत्कार करण्यात आला.

रिया पाटीलने दक्षिण कोरिया येथे झालेल्या एशियन अंडर-२० अॅथलेटिक्स चॉम्पियनशिप ४ बाय १०० रिले स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवल्याबद्दल तिचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. डी. बी. बिरनाळे, डॉ. धनंजय पाटील, श्रीमती स्मिता कुंभार, अभिषेक मस्कर उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ६ परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे ६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. एकूण ५८९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. अशी माहिती संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी दिली.